# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## मतदान केंद्रावरील मतदानासाठी उमेदवारांना सूचना

१. विद्यापीठाच्या अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यासमंडळे या अधिकार मंडळासाठी शिक्षक व नोंदणीकृत पदवीधर संवर्गानुसार निवडणूका दि.१७ नोव्हेंबर, २०१७ रोजी ३३ मतदान केंद्रांवर घेण्यात येणार आहेत.

२. मतदानाची वेळ सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत आहे. उमेदवार / प्रतिनिधी यांनी मतदान केंद्रावर सकाळी ठिक ८.३० वाजता हजर राहणेचे आहे.

३. केंद्राध्यक्षांकडून उमेदवार / प्रतिनिधी यांनी बॅजेस मागून घ्यावेत व त्याचा वापर करावा.

४. उमेदवारांनी प्रतिनिधी पाठविल्यास तसे लेखी अधिकार पत्र प्रतिनिधी यांना देणेचे आहे. उमेदवाराचे अधिकार पत्र असले शिवाय प्रतिनिधीस मतदान केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही.

५. रिकामी पेटी सकाळी ठिक ८.४५ वाजता सील करण्यास केंद्राध्यक्ष सुरूवात करतील. त्यावेळी उमेदवार / प्रतिनिधी यांनी हजर राहणेचे आहे. मतपेटी सील करताना उमेदवार / प्रतिनिधी यांनी त्यावर सही करणेची आहे. यावेळेत कोणताच उमेदवार / प्रतिनिधी हजर नसल्यास स्वत: केंद्राध्यक्ष आपल्या सहीने मतपेटी सील करतील.

६. मतदान केंद्रावर उमेदवार / प्रतिनिधी यांना प्रचार करण्यास किंवा मतदाराबरोबर चर्चा करण्यास सक्त मनाई आहे.

७. मतदानाची अंतिम वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत असलेने ठिक ४.५५ वाजता रांगेमध्ये काही मतदार असल्यास रांगेतील मतदारांना आपल्या सहीच्या चिट्ठ्या देतील. मतदारांना चिट्ठ्या देताना रांगेत जेवढे मतदार असतील तेवढ्या क्रमांकाच्या चिट्ठ्या करताना शेवटच्या मतदारास पहिल्या क्रमांकाची चिठ्ठी देऊन सुरूवात करावी.

८. मतदानाची वेळ संपल्यानंतर केंद्राध्यक्ष मतपेटी सील करण्यास घेतील. त्यावेळी उमेदवार / प्रतिनिधी यांनी हजर राहून सीलवर सही करावयाची आहे. यावेळेत कोणताच उमेदवार / प्रतिनिधी हजर नसल्यास स्वत: केंद्राध्यक्ष आपल्या सहीने सील करतील.

९. उमेदवार / प्रतिनिधी यांनी निवडणूक कामी मतदान केंद्रावर अडथळा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. मतदान शांततेने पार पाडण्यास केंद्राध्यक्ष व त्यांच्या सहकाऱ्यांना सहकार्य करावे.

निवडणूक निर्णय अधिकारी
तथा कुलसचिव